**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

ग्राहक तक्रार क्र. २५४/२००८/ दिनांक :

१) श्री. आप्पासो विठोबा माळी, अर्जदार
मु. बेळुंखी, पो. बाज, ता. जत,
जि. सांगली.

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, विश्रामबाग,
सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
कवठे महांकाळ, सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.

उप विभाग, जत,
जि. सांगली.

**कोरम** :- १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार



### संयुक्त न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच यांचेतर्फे दिनांक : ०७.०१.२००९

श्री. आप्पासाहेब विठोबा माळी,रा. मु.पो. बेळुंकी, जि. सांगली यांनी गट क्र. ८०८/१ या आपल्या शेतात शेतीपंपासाठी ३ एच.पी. इतकी जोडणी मिळण्याबद्दल प्रथमत: दिनांक २४.१२.९९ व नंतर दिनांक २४.१२.२००२ असे दोन अर्ज दाखल केले होते. तथापी जोडणी न मिळाल्याबद्दल दि. १६.७.२००८ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे " क्ष " फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीचा निर्णय मान्य न झाल्याने कोल्हापूर परिमंडळ ग्राहक तक्रार निवारण मंच यांचेकडे दि. २०.१०.२००८ रोजी तक्रार पाठविली. दि. २४.१०.२००८ रोजी मंचात तक्रार दाखल करुन संबंधित विरुध्द पक्षकार यांचे लेखी म्हणणे मागितले व दि. १.१२.२००८ रोजी सांगली मंडल कार्यालय येथे सुनावणी ठेवली.

सुनावणी दरम्यान विरुध्द पक्षकार व तक्रारदार यांनी आपले म्हणणे मांडले व लेखी पुरावे व कागदपत्रें दाखल केली. त्यानुसार ग्राहकाची तक्रार व मागणी तसेच वि.प.चे त्यावरील मत सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे आहे.

श्री. आप्पासाहेब विठोबा माळी, मु.पो. बेळुंकी, ता. जत यांनी गट क्र. ८०८/१ मध्ये शेती वापरसाठी ३ एच.पी.चे कनेक्शनसाठी दि. दि. २४.१२.१९९९ व २४.१२.२००२ असे दोन वेळा मागणी अर्ज एकाच कारणासाठी दिले. दि. १४.७.२००८ रोजी सांगली मंडलच्या अंतर्गत कक्षास तक्रार अर्ज केला व त्याची एक प्रत ग्राहक तक्रार निवारण मंचास पाठविली. त्या अनुरोधाने कक्षाने केलेला निर्णय मान्य नसल्याने ग्राहकाने ग्राहक तक्रार निवारण मंचात तक्रार दाखल केल्याचे दिसून येते. विनाविलंब वीज कनेक्शन मिळावे. अधिकारी व कर्मचारी यांनी कामात हलगर्जीपणा, सेवेत हयगय, टाळाटाळ, मानसिक त्रास याबद्दल नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी तक्रार अर्जात केली आहे.

वि.प.ने आपल्या दि. १४.११.२००८ च्या लेखी म्हणण्यात दि. २४.१२.२००२ रोजी उप विभाग, जत यांचेकडे ३ एच.पी. साठी सदर श्री. माळी यांचा अर्ज आल्याचे मान्य केले आहे. त्यानंतर जत उप विभागाच्या सहाय्यक अभियंता यांनी दि. ३१.१२.२००२ रोजी शाखा कार्यालय डफळापूर यांच्याकडे पाहणी करणेसाठी सदरचा अर्ज पाठविला. त्यानंतर सदरचा सर्व्हे रिपोर्ट व एस्टिमेट सदर शाखा कार्यालयाकडून दि. १६.९.२००८ रोजी जत उप विभागीय कार्यालयास आला. लगेचच दि. १७.९.२००८ रोजी पत्र क्र. ३९०६ने

विभागीय कार्यालयास एस्टिमेट व सर्व्हे रिपोर्ट मिळाला. तो रिपोर्ट व एस्टिमेट EE/KMS/SPA/PE/950169/182/08-09 dated 17.9.2008 पत्राने मंजूर करण्यात आला आहे. त्यानंतर ०.१२ कि.मी. एल.टी. लाईन, ट्रान्सफॉर्मर ०.५४ कि.मी. एच.टी. लाईन उभी करुन दि. १७.११.२००८ रोजी वीज कनेक्शन दिल्याचे नमूद केले आहे. ग्राहकाने दि. १८.९.२००८ रोजी तपासणी अहवाल (टेस्ट रिपोर्ट) दिल्याचे नमूद केले आहे. ग्राहकास रक्कम भरण्याचे चलन दि. १७.९.२००८ रोजी दिल्यानंतर व ग्राहकाने सदरची रक्कम दि. १४.९.२००८ रोजी जमा केल्यानंतर सर्वच काम जलद गतीने पूर्ण करुन तीन महिन्यांचे आंत जोडणी दिलेली आहे.

सुनावणीचेवेळी अर्जदार हजर नाहीत. परंतु वि.प.तर्फे श्री. उत्पात, सहाय्यक अभियंता हजर झाले व त्यांचे म्हणणे मंचाने ऐकले आहे.

वरील प्रमाणे ग्राहकाची तक्रार, त्यावरील विरुध्द पक्षकाराची कार्यवाही तपशिल, म्हणणे, कागदपत्रें, अंतर्गत कक्ष, सांगली यांचा निर्णय याचा एकत्रित विचार करता, खालील मुद्दे या तक्रार प्रकरणी निष्कर्षास उदभवतात.



१) प्रश्न : तक्रारदार श्री. माळी यांनी वीज मागणीसाठी दोन वेळा ( २४.१२.१९९९ व २४.१२.२००२) अर्ज केला हे बरोबर आहे काय ?
उत्तर : होय. पोष्टाची पोहोच पावती २४.१२.१९९९ अर्जासंदर्भात व २४.१२.२००२ च्या संदर्भात अर्जाची सही–शिक्क्याची पोहोच दाखल केली आहे.

२) प्रश्न : कृति मानके परिशिष्ट अ मधील कृती मानके क्र. २ प्रमाणे ग्राहकास खर्चा संबंधी तपशिल कळविण्यास विलंब झाला आहे काय ?
उत्तर : होय. विलंब झाला आहे.

३) प्रश्न : सदर विलंबाबद्दल वि.प.वर दंडात्मक कारवाई होणे उचित आहे काय ?
उत्तर : दंडात्मक कारवाई होणे उचित आहे.

४) प्रश्न : आदेश ?
उत्तर : अखेरच्या आदेशाप्रमाणे

<u>कारणमिमांसा</u> :

अर्जदार श्री. आप्पासाहेब विठोबा माळी, मु.पो. बेळूंकी यांनी आपल्या गट क्र. ८०८/१ या शेतात ३ एच.पी.चे शेतीपंपासाठीचे जोडणीसाठी दोन वेळा अर्ज केल्याचे नमूद केले आहे ( २४.१.९९ व २४.१२.२००२). दि. २४.१२.१९९९ च्या अर्जासंबंधी त्यांनी पोष्टाची सहाय्यक अभियंता, शाखाधिकारी, डफळापूर यांचे नावेची पावती जोडली आहे. तथापी प्रथम अर्जाचा आवश्यक तपशिल व पुरावे दाखल केले नसल्यामुळे व सदर टपालातील तपशिल मजकूर समजता येत नसल्यामुळे सदर अर्जाचा विचार करणे अयोग्य होईल. मात्र दि. २४.१२.२००२ च्या मागणी अर्जाची सहाय्यक अभियंता यांच्या सही–शिक्क्याची पोहोच विचारात घेवून त्यासंबंधी न्याय

निर्णय करणे योग्य होईल. दि. २४.१२.२००२ पासून अर्जदाराने दि. १४.७.२००८ पर्यंत वि.प.तर्फे अर्जाबाबत कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. मात्र दि. १४.७.२००८ रोजी अंतर्गत कक्ष, सांगली यांचेकडे अर्ज केल्यानंतर कार्यवाहीची चक्रे जलदगतीने फिरलेली दिसतात. दिनांक २४.१२.२००२ रोजी दिलेल्या अर्जावर वि.प.तर्फे वेळीच निर्णय घेवून खर्चाबाबत तपशिल कळविला नाही. उप विभाग, जत यांच्याकडून पत्र क्र. ५६२६ दि. ३१.१२.२००२ रोजी शाखा अधिकाऱ्यास कळवूनही दि. ३१.१२.२००२ पासून दि. १६.९.२००८ पहाणी अहवाल दिला नाही तसेच पुढील कार्यवाही केली नाही. त्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( कृती मानके व भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ मधील परिशिष्ट " अ " मधील तरतुदीनुसार ' विद्युत पुरवठ्या संबंधात खर्चाचा तपशिल न देणे ' या सदराखालील कारणास्तव दंडात्मक कारवाई करणे योग्य होईल.



सदरचे विनियम हे २० जानेवारी २००५ रोजी पासून अमंलात आलेमुळे ' विद्युत पुरवठा करणे ' या सदराखालील सर्व बाबींसाठी ' वितरण मेन्सचा विस्तार करण्याची किंवा नवीन उप केंद्र स्थापन करण्याची आवश्यकता असल्यास ' कळविण्याच्या खर्चाचा तपशिल हा अर्ज दाखल झाल्यापासून म्हणजेच २४.१२.२००२ पासून ३० दिवसांचा असल्याने २३.१.२००३ पर्यंत कळविणे आवश्यक होते. परंतु त्यावेळी जुनाच अधिनियम अस्तित्वात होता. तसेच २० जानेवारी २००५ नंतर कृतीची मानके व भरपाईचे निश्चितीकरण हे विद्युत आयोगाचे विनियम अस्तित्वात आल्यानंतरही कोणतीही कार्यवाही झाली नाही. सबब मंचास त्या नंतरच्या काळाचाच दंडात्मक कारवाईसाठी विचार करावा लागेल. त्यामुळे २० जानेवारी २००५ ते १७.९.२००८ खर्चा संबंधात तपशिल न कळविलेला कालावधी १९० आठवडे ( ०५-०६ चे ५२ आठवडे ०६-०७ चे ५२ आठवडे ०७ ते ०८ चे ५२ आठवडे व त्यानंतरच्या काळातील ३४ आठवडे) भरपाई प्रति आठवडा रु. १००/- किंवा त्याच्या भागास असल्याने एकूण रु. १९,०००/- इतकी दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. सबब रु. १९०००/- वि.प.कडून अर्जदारास भरपाई देण्याचा आदेश देणे योग्य होईल.

पुढे खर्चाबाबत कळविल्याने, खर्चाचे पैंसे भरल्यानंतर तीन महिन्याचे आंत वीज जोडणी दिल्याचे दिसून येते. सदरची दंडात्मक कारवाई हि टाळाटाळ केल्याबद्दलच असल्याने वेगळ्या आदेशाची गरज नाही. तसेच शेती नुकसान व मानसिक त्रासाबद्दल योग्य ते पुरावे दाखल न केल्यामुळे सदरची मागणी फेटाळावी लागत आहे.

अंतर्गत कक्ष, सांगली यांनी आपला निर्णय देतांना सर्व बाबींचा विचार केलेला दिसून येत नाही.

## आदेश

१) अंतर्गत कक्ष, सांगली यांचा निर्णय क्र. ८४५४ दि. ३०.९.२००८ रद्द करणेत येत आहे.

२) खर्चाचा तपशिल कळविणेस झालेल्या विलंबाबद्दल प्रति आठवड्यास रु. १००/- प्रमाणे १९० आठवड्याचे रु. १९०००/- भरपाई रक्कम वि.प.ने अर्जदारास द्यावी.

३) मानसिक त्रास व नुकसान भरपाईची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( जी. सी. लेले )
सदस्य,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : ०७.०१.२००९

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..

<u>सदस्य सचिव, ग्राहक तक्रार निवारण मंच यांचे म्हणणे / मत तक्रार प्रकरण क्र. २५४/०८</u>

श्री. आप्पासो विठोबा माळी, रा. बेळुंखी, पो. बाज, तालुका जत, जिल्हा सांगली यांनी ग्राहक तक्रार निवारण मंच. म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, कोल्हापूर परिमंडळ यांजकडे तक्रार प्रकरण क्र. २५६/०८ ने दाखल केलेल्या ३ अश्वशक्ती नवीन शेती पंप वीज जोडणीला वीज पुरवठा करण्यास झालेल्या विलंबा बाबतच्या तक्रारीवर सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांचे म्हणणे/मत खालील प्रमाणे मांडणेत येत आहे.

श्री. आप्पासो विठोबा माळी, मु. बेळुंखी, पो. बाज, ता. जत, जि. सांगली यांनी तेथील गट क्र. ८०८/१ मध्ये ३ अश्वशक्ती शेतीपंप जोडणीस वीज पुरवठा मिळणे करीता दि. २४.१२.१९९९ रोजी व दि. २४.१२.२००२ रोजी अर्ज वितरण कंपनीकडे सादर केले होते. अद्याप वीज जोडणी मिळाली नाही व अर्जात त्यांनी वीज जोडणी देणेस काल मर्यादा तरतूद आहे का ? त्यामुळे नुकसान भरपाई मिळू शकेल का ? तसेच शेती पंप जोडणी किती कालावधीत मिळते इ. प्रश्न उपस्थित केले आहेत.

तक्रारदार ग्राहकाने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे दि. १६.७.२००८ ला क्ष नमुन्यातील अर्जात तक्रार दाखल केली होती. त्यावर कक्षाने निकाल पत्र आदेश क्र. ८४५४ दि. ३०.९.२००८ ने निकाल दिला आहे. सदर निकाल मान्य न झालेने तक्रारदाराने विहीत अ नमुन्यात नसलेला अपील अर्ज मंचाकडे दि. २४.१०.२००८ रोजी दाखल केला. त्यानुसार मंचाने कार्यवाही सुरु केली. मुद्देनिहाय अहवालाची संबंधित अधिकाऱ्याकडून मागणी केली. व सुनावणीची तारीख १.१२.२००८ ठिकाण सांगली मंडल कार्यालय अशी ठरविण्यात आली.

दिनांक १.१२.२००८ रोजी सुनावणीच्यावेळी वितरण कंपनीतर्फे श्री. उत्पात , सहाय्यक अभियंता, जत उप विभाग हे एकमेव उपस्थित होते. तक्रारदारातर्फे कोणीही उपस्थित नव्हते सदर अूपस्थितीची मंचाने नोंद घेतली.

वितरण कंपनीतर्फे निवेदन करणेत आले की, अर्जदाराच्या ३ अश्वशक्ती शेतीपंपास वीज जोडणी मिळणेस अर्ज दिनांक २४.१२.२००२ रोजी मिळाला. सदर वीज जोडणी बाबतचा प्राथमिक पाहणी अहवाल दिनांक १६.९.२००८ ला क्षेत्रीय जत कार्यालयाकडून प्राप्त झालेवर त्यास त्वरीत वि.प.कडून दि. १७.९.२००८ ला मंजुरी दिली ज्यात २ खांबांचे लघुदाब वाहिनीसह ०.५४ कि.मी. उच्चदाब वीज वाहिनी

उभारली व  जादा ६३ केव्हीए रोहित्र उभारणी कामांचा समावेश आहे.  तक्रारदारास दि. १७.९.२००८ ला चलन देणेत आले आहे.  सदर रकमेचा भरणा अर्जदार ग्राहकाने केला असून विद्युत मोटर पंप बसविलेचा चाचणी अहवाल दि. १८.९.२००८ ला दिला.  दरम्यान दोन खांबांच्या लघुदाब वाहिनीच्या उभारणीचे काम पूर्ण करुन चालू जाळयातून ग्राहकास दि. १७.११.२००८ ला वीज जोडणी देण्यात आलेली आहे व उर्वरित उच्चदाब वाहिनीचे व रोहित्र उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

तक्रारदाराने वीज जोडणी दि. १७.११.२००८ रोजी मिळाली असल्यामुळे तक्रार राहिली नसल्याचे लेखी पत्र वि.प. अधिकाऱ्यामार्फत मंचास  दिले आहे.  त्यामुळे तक्रारीचे निवारण झाली आहे व तक्रार निकालात निघाली आहे असे स्पष्ट होते.

सुनावणीच्या दरम्यान समोर आलेले मुद्दे, उपलब्ध कागदपत्रें, वितरण कंपनीतर्फे देण्यात आलेले जबाब, इत्यादी विचारांत घेवून सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंचकडून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

..२..

## आदेश

१)	ग्राहकाची वीज जोडणी मिळावी या तक्रारीची सोडवणूक झाली असलेमुळे व ग्राहकाने या बाबत तक्रार राहिली नसल्याचे लेखी पत्र वितरण कंपनीस सादर केले असलेमुळे तक्रार निकालात काढण्यात आली आहे.  भरपाई देण्याच्या मागणीचा विचार करता येणार नाही.

२)	तक्रारदाराने अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्देनिहाय स्पष्टीकरण खालील प्रमाणे आहे.

मुद्दा अ – वीज जोडणी मिळावी.

उत्तर :सदर वीज जोडणी दि. १७.११.२००८ ला देण्यात आलेली आहे.

मुद्दा क्र. ब – वीज मागणी अर्ज दिलेपासून कनेक्शन करिता काल मर्यादा आहे का ?

उत्तर : सदर मर्यादा वीज नियामक आयोग २००५ पासून ठरविण्यात आली.

मुद्दा क्र. क – जोडणी विलंबा बाबत नुकसान भरपाई मिळणे

उत्तर : ग्राहकाने तक्रार निवारण झाल्याचे पत्र दिले.

मुद्दा क्र.ड–जोडणी मिळण्याचा काल किती ?

उत्तर मुद्दा क्र. अ प्रमाणे

३)	सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६  ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४)	या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( एस.आर. बांबळे )
सदस्य सचिव,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : १२.०१.२००९